# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

**धनगर समाजाला आरक्षणाचा लाभ देण्याबाबत**

**(१) १०३६३ (१९-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ८६२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाला आरक्षण मिळावे व ते कायद्याच्या कसोटीवर टिकावे, याबाबत अभ्यास करण्याचे काम "टिस" या संस्थेला देण्यात आले असून त्यानुषंगाने सदर संस्थेने शासनास सादर केलेला अहवाल धनगर समाज अनुसूचित जमातीचे निकष पूर्ण करतो किंवा कसे याबाबत असून सदर अहवालावर मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय तात्काळ प्राप्त व्हावेत यादृष्टीने शासनामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालावर शासन विचारविनिमय करुन धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत निर्णय घेणार आहे काय,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धनगर समाजाला आरक्षण मिळावे याकरिता सदर अहवालावर मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय तात्काळ प्राप्त व्हावेत याद्दष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१४-०३-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे. मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त व्हावेत याद्दष्टीने महाधिवक्ता यांच्या कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजर्षी शाहू महाराज अनुदानित वसतिगृह योजनेतील कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(२) १०३९६ (२०-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजर्षी शाहू महाराज अनुदानित वसतिगृह योजनेतील सुमारे ८ हजार कर्मचारी ३,००० ते ७,००० रुपये इतक्या तुटपुंज्या पगारावर काम करीत असल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्वात जुन्या राजर्षी शाहू महाराज अनुदानित वसतिगृह योजनेतील वसतिगृहात काम करणाऱ्या ८००० कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी लागू करावी, ही मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राजर्षी शाहू महाराज अनुदानित वसतिगृह योजनेतील सुमारे ८ हजार कर्मचाऱ्यांना तातडीने सरकारी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०७-०३-२०२२) :** (१) नाही.

तथापि, सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे मानधन देण्यात येते.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मानधन** |
|---|---|---|
| १. | अधिक्षक | रुपये ९२००/- |
| २. | स्वंयपाकी | रुपये ६९००/- |
| ३. | मदतनीस | रुपये ५७५०/- |
| ४. | चौकीदार | रुपये ५७५०/- |

(२) व (३) स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील कर्मचारी हे मानधनावर कार्यरत आहेत. सदरील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार मा.उच्चाधिकार समितीसमोर विभागाने प्रस्ताव सादर केला होता.

मा.उच्चाधिकार समितीने दिनांक १५/११/२०२१ रोजी अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा विभागाचा प्रस्ताव अमान्य केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील बार्टीच्या अधिनस्थ असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३) १०३९९ (२०-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील बार्टीच्या अधिनस्थ असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान संस्थेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार आणि अनियमिततेप्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनाने समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातीळ दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०७-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी गठित करण्यात आलेल्या समितीचा चौकशी अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अभियात्रिकी,परिचारिका व इतर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शासकीय वसतिगृह बंद असल्यामुळे हाल होत असल्याबाबत

**(४) १०४०५ (२०-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होताच विविध क्षेत्र सुरु करण्यात आली असतानाही सामाजिक न्याय विभागांतर्गत प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी असलेली शासकीय वसतिगृहे अद्यापही कुलुपबंद स्थितीत असून वसतिगृहांमधील विविध कामांची कंत्राटे देखील यापूर्वीच संपली असल्याचे दिनाक १३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या अभियांत्रिकी व परिचारिका व इतर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना माहे एप्रिल, २०२१ रोजी वा त्यादरम्यानपासून महाविद्यालयात प्रशिक्षणासाठी बोलविण्यात आले असतानाही शासकीय वसतिगृह बंद असल्यामुळे दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांनाही भाड्याच्या खोलीत रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वसतिगृहे सुरु करण्यासंदर्भात माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यादरम्यान शासनास पाठविण्यात आलेल्या प्रस्तावान्वये लवकरच वसतिगृहे सुरु होतील असे आश्वासन मा.आयुक्त, सामाजिक न्याय विभाग यांनी दिले असून प्रस्तावाबाबत शासनाकडून अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अभियात्रिकी,परिचारिका व इतर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे होत असलेले हाल लक्षात घेता शासकीय वसतिगृह तातडीने सुरु करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१६-०३-२०२२) :** (१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील शाळा, महाविद्यालये दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने विभागाने शासन पत्र दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ अन्वये शासकीय वसतिगृहे ही दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे.

प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व व्यवस्था करण्याबाबत प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (सर्व) यांना कळविण्यात आलेले आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) विभागाने शासन पत्र दिनांक १ ऑक्टोबर,२०२१ अन्वये दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ पासून शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहन अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(५) १०४३१ (२०-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यास रुपये ५० हजार प्रोत्साहन अनुदान दिले जाते जात असून केंद्र शासनाकडून महाराष्ट्राला गत ७ वर्षात १११ कोटी रुपये मिळाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक वर्षांपासून सदर आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे अर्ज संबंधित विभागाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून सन २०१९ - २०२० व सन २०२०- २०२१ या दोन वर्षांत मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहन अनुदानाची रक्कम मिळण्याबाबतची समाज कल्याण विभागात आर्थिक तरतूद नसल्यामुळे गत २ वर्षे अर्ज करुनही सदर जोडप्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे आर्थिक प्रोत्साहन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना आर्थिक प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२७-०३-२०२२) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

सदर योजनेंतर्गत सन २०१२-१३ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात केंद्र हिस्सा ५० टक्के प्रमाणे एकूण रुपये ९९७६.२५ लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे. सदरचा निधी क्षेत्रिय कार्यालयांना खर्च करण्यास वितरीत केला आहे.

त्यानुषंगाने केंद्राचा हिस्सा ५० टक्के व राज्याचा हिस्सा ५० टक्के याप्रमाणे सन २०१२-१३ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेला एकूण रुपये १८०९४.३७ लक्ष निधीमध्ये प्रति जोडपे रुपये ५०,०००/- याप्रमाणे एकूण ३६१९० जोडप्यांना क्षेत्रिय कार्यालयामार्फत लाभ देण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील मोसंबी पिकाचा शेतीमाल निर्यातीचे समुहामध्ये समावेश करण्याबाबत

**(६) १०४५८ (१४-११-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय कृषी निर्यात धोरणातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या निर्यात उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी २० समुह (क्लस्टर्स) गठीत करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळी, डाळींब, हापूस आंबा, केशर आंबा, संत्री, द्राक्षे, कांदा, काजू फुले, बेदाना, भाजीपाला, बिगर बासमती तांदुळ, कडधान्ये गुळ, सिमला मिरची, हळद, मासजन्य पदार्थ, दुग्धजन्यपदार्थासह, मत्स्यजन्य पदार्थाकरिता पीक निहाय समुह तयार करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील औरंगाबाद व जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मोसंबी क्षेत्र लागवड असल्याने शेतीमाल निर्यातीमध्ये मोसंबी पिकाचा समावेश केल्यास, शेतकऱ्यांना याचा फायदा होणार असल्याने शेतीमाल निर्यातीचे समुहामध्ये मोसंबी पिकाचा समावेश करण्याची मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील मोसंबी पिकाचा शेतीमाल निर्यातीचे समुहामध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे, राज्याचे कृषी निर्यात धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता प्रत्येक पिकांसाठी पिकनिहाय क्लस्टर सेल गठीत करणेबाबत दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. यानुषंगाने केळी, डाळींब, हापूस आंबा, केशर आंबा, संत्रा, द्राक्षे, कांदा, काजू, फुले, बेदाणा, भाजीपाला, बिगर बासमती तांदुळ, डाळी व कडधान्ये, तेलबिया, गुळ, मसाले (लाल मिरची), मसाले (हळद), मांसजन्य पदार्थ, दुग्धजन्य पदार्थ व मत्स्यजन्य पदार्थ याकरिता २० पिकनिहाय क्लस्टर सेल गठीत करण्यात आलेले आहेत.

(३) व (४) हे खरे आहे, मोसंबी या पिकासाठी क्लस्टर सेल गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी सुरू करण्यात आलेल्या शाहू, फुले, आंबेडकर निवासी/आदिवासी आश्रमशाळांना अनुदान मिळण्याबाबत

**(७) १०४५९ (२०-११-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या १६५ आश्रमशाळांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी निर्गमित झालेल्याा शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० पासून तपासणीच्या अधिन राहून २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्या सुमारास काढलेल्या परिपत्रक क्र.बीसीएच-२०१८/प्र.क्र.६१ शिक्षण-२ नुसार सदर १६५ आश्रम शाळांची तपासणी करुन मा.आयुक्त, समाजकल्याण यांनी शासनाकडे अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्रमशाळांचा लेखाशीर्ष २२२५ एफ-५०८ असून आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान/वेतनेत्तर अनुदान/इमारत भाडे व विद्यार्थ्यांचा परिपोषण आहार इ. बाबींसंदर्भातील निधी वितरीत करण्याची कार्यपध्दती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या १६५ आश्रमशाळांसाठी तातडीने अनुदान प्राप्त व्हावे यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०७-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ८ मार्च,२०१९ अन्वये शाहू,फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेंतर्गत १६५ आश्रमशाळांना शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० पासून तपासणीच्या अधिन राहून २० टक्के अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी दिनांक ७/०५/२०२१ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे.
(३) व (४) शासन निर्णय दिनांक १५ जून, २०२१ अन्वये शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळांचा खर्च भागविण्यासाठी २२२५- एफ ५६८ या लेखाशिर्षास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत शासनास प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाची छाननी करून पात्र आश्रमशाळांना नियमानुसार २० टक्के अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील अतिमागास असलेल्या भामरागड भागात आदिवासींकरीता रस्त्यासाठी निधी उपलब्ध करणेबाबत

**(८) १०५०१ (१९-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली ह्या अतिमागास जिल्ह्यात समावेश असलेल्या भामरागड ह्या दुर्गम भागात अजुनही बारमाही रस्त्याअभावी आदिवासींना २५ किमी पायपीट करावी लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दुर्गम भागाकरीता शासनाने खावटी अनुदान आणि किटचे वाटप केले असून ते आणण्याकरीता आदिवासीना २५ किलोमीटरपर्यंत पायपीट करावी लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोरगरिब आदिवासींना खावटी योजना मंजूर झाली मात्र सदर योजनांद्वारे मिळणारी मदत दुर्गम भागात रहाणाऱ्या लाभार्थ्यांपर्यंत बारमाही रस्त्याअभावी पोहचत नसून, शासन आदिवासींकरीता अनेक योजना,पॅकेज जाहीर केले असूनही भामरागड (जि.गडचिरोली) यासारख्या दुर्गम भागात रहाणाऱ्या आदिवासींना तातडीने रस्त्याकरीता निधीची तरतूद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी जिल्ह्यातील दुर्गम भागात रहाणाऱ्या आदिवासींकरीता रस्ता तयार करण्याकरीता निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२८-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

तथापि, भामरागड तालुक्यामध्ये पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे बारमाही नदी व नाल्यांना पूरपरिस्थिती असते. त्यामुळे पावसाळ्यात या तालुक्याचा काही दिवसांसाठी संपर्क तुटतो.

माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे रस्ते व पुलांअभावी स्थानिकांना काही दिवस पायपीट करावी लागली, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

शासकीय आदिवासी आश्रमशाळा,लाहोरी येथून खावटी किट घेऊन जाण्यासाठी त्या परिसरातील ८ ते १० कि.मी. अंतरावर राहणाऱ्या आदिवासी बांधवांना गुंडेनूर नाला ओलांडून कंबरभर पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागला असल्याबद्दलचे वृत्त वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

- भामरागड तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राज्यमार्ग क्रमांक ३८० वर सुमारे १० कि.मी. चा रस्ता तसेच, जुही नाल्यावर पुलाच्या बांधकामाचे काम करण्यात येत आहे.
- “पूर हानी दुरुस्ती” कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील रस्त्यांची कामे सुरु करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे. तसेच, प्रजिमा क्र. २३ या रस्त्यावरील सुमारे ४० कि.मी. रस्ते व पुलांची कामे सुरु करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.
- आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी उपयोजनेतंर्गत करण्यात येणारी रस्त्यांची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग यांसारख्या विभागांच्या योजनांसाठी पुरक स्वरुपाची योजना असल्याने या विभागामार्फत आदिवासी भागातील रस्त्यांना मर्यादीत स्वरुपात निधी देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोककल्याणकारी योजनांचे थकीत अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तातडीने जमा करण्याबाबत

**(९) १०५११ (२०-११-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड, श्री.अंबादास दानवे, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोककल्याणकारी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना इत्यादी पाच योजनांतर्गत अनाथ, दिव्यांग, परितक्त्या, घटस्फोटीत व विधवांसाठी व इतर लाभार्थ्यांसाठी प्रतिमहा प्रत्येक एक हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरमहा अनुदानाची रक्कम निराधार लाभार्थींच्या बँक खात्यात जमा करण्यात येते, परंतु माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२१ या दोन महिन्याचे अनुदान निराधार लाभार्थींच्या खात्यात अद्याप जमा करण्यात आले नसून यवतमाळ जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना माहे जुलै, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ या तीन महिन्याचे अनुदान मिळाले नसून औरंगाबाद जिल्हयात सदर अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याने जिल्हयांतील लाभार्थींना आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विशेषत: वर्धा जिल्हयातील श्रावण बाळ, संजय गाधी निराधार योजनेचे गत ३ महिन्यांपासून ९३ हजार लाभार्थ्यांचे अनुदान न मिळाल्यामूळे गोरगरीब वृध्दाची गैरसोय होत असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने उक्त लोककल्याणकारी योजनांचे थकीत अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तातडीने जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०७-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) यवतमाळ व वर्धा जिल्हयामधील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे ऑक्टोबर, २०२१ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले असून माहे नोव्हेंबर, २०२१ चे अर्थसहाय्य वितरणाची कार्यवाही सुरु आहे. तसेच औरंगाबाद जिल्हयामधील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले असून माहे ऑक्टोबर व माहे नोव्हेंबर, २०२१ चे अर्थसहाय्य वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणारे शासनाने तोडणी वाहतूक संदर्भातील काढलेले परिपत्रक रद्द करणेबाबत

**(१०) १०५३२ (१९-११-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणारे तोडणी वाहतूक संदर्भातील दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास राज्य शासनाने काढलेले परिपत्रक रद्द करण्याची मागणी शेतकरी संघटनेचे प्रवक्ते श्री.भानुदास शिंदे यांनी साखर आयुक्त, पुणे यांना निवेदनाद्वारे केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त निवेदनासंदर्भात शासनाकडून आजमितीस कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री.भानुदास शिंदे, रयत क्रांती संघटना, पुणे यांचे दिनांक १४/१०/२०२१ रोजीचे याबाबतचे निवेदन साखर आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेले आहे. त्यानुषंगाने साखर आयुक्त कार्यालयाने दिनांक २४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये त्यांना उत्तर पाठविले आहे. ऊस तोडणी व वाहतूक खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करणेबाबतच्या दिनांक ०८/०३/२०१७ च्या शासन परिपत्रकामधील सूचनांची अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन साखर आयुक्त यांच्या प्रस्तावानुसार शासनाने ऊस तोडणी व वाहतूक खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करण्याबाबतचे दिनांक ०८/०३/२०१७ चे परिपत्रक रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. ऊस तोडणी व वाहतूक खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करणेबाबतच्या दिनांक २९/०९/२०२१ रोजीचा शासन निर्णय स्थानिक वस्तुस्थितीचा विचार करता योग्य आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयुक्त, समाजकल्याण, पुणे, याच्या आस्थापनेवरील कंत्राटीतत्वावर कार्यरत संगणक परिचालक या पदांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(११) १०५४५ (२०-११-२०२१) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे, याच्या आस्थापनेवरील सन २००७- २००८ पासून वा त्यादरम्यान कंत्राटीतत्वावर कार्यरत असणाऱ्या संगणक परिचालक या पदांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर गत १४ वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण,आयुक्तांमार्फत सदर प्रस्ताव दिनांक ४ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास शासनास शिफारसीसह सादर करण्यात आलेला असून कर्मचाऱ्यांना नियमित वेतन श्रेणी लागू करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक ६ जून, २०१७, ३ जुलै, २०१७ व दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सूमारास संबंधित विभागाचे अधिकारी यांची बैठक आयोजित करून निर्देश दिले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे, याच्या आस्थापनेवरील कंत्राटीतत्वावर कार्यरत असणाऱ्या संगणक परिचालक या पदांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर गत १४ वर्षापासून प्रलंबित असून सदर प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०६-०३-२०२१) :** (१) हे, खरे नाही

(२) व (३) होय, हे खरे आहे.

आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे आस्थापनेवरील कंत्राटी तत्वावर कार्यरत असणाऱ्या संगणक ऑपरेटर या पदांवर सेवारत असलेल्या संगणक परिचालक यांच्या सेवा नियमित करता येणार नसल्याचे शासनाने निर्णय

घेतलेला आहे. सदर संगणक ऑपरेटर यांनी त्यांच्या सेवा नियमित करणे करीता मा.उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई येथे रिट याचीका क्र. ११८९/२०१८ अन्वये दाखल केली असून प्रस्तुत प्रकरण सद्य:स्थितीत न्याय प्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुलाब चक्रीवादळामुळे बाधित झालेल्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(१२) १०५६४ (२०-११-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे बंगाल उपसागरामध्ये निर्माण झालेल्या गुलाब चक्रीवादळाचा फटका विदर्भ, यवतमाळ व मराठवाड्यातील अनेक जिल्हयांना बसला असून विदर्भात अतिवृष्टी झाल्याने सोयाबीन, शेंगा व कपासी या खरिप पिकांचे तर मराठवाड्यात ३३ लाख शेतकऱ्यांचे २७ लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले असून ८१७ हेक्टर जमीन मुसळधार पावसामुळे वाहून गेली असून दहा हजार पिके जमीनदोस्त झाली तसेच खरीप पिकाचे ८८५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज महसूल विभागाने व्यक्त असून या सर्व नुकसानीचे पंचनामे महसूल व इतर विभागाने सुरु केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी पाझर तलाव/केटीवेअर फुटून रस्त्यांची दुरवस्था झाली असून छोटे पुल वाहून गेल्याच्या घटना घडल्या असून मराठवाडा व इतर जिल्हयातील शेतकऱ्यांना व इतरांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) च्या निकषाप्रमाणे तात्काळ मदत उपलब्ध करुन नुकसानीचे पंचनामे करुन मृत पावलेल्या कुटुंबीयांना शासनाच्या वतीने आर्थिक पॅकेज देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, मराठवाडा व इतर जिल्हयात अतिवृष्टीमुळे जवळपास २० हजार हेक्टर पिकांच्या नुकसानीचे पंचनामे अपूर्ण अवस्थेत असताना गुलाब चक्रीवादळामुळे दिनांक २७ आणि २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे २५१ मंडळात अतिवृष्टीची नोंद होवून गावांचा जगाशी संपर्क तुटला तसेच बाजारात, शेतात पाणी भरुन १२ लाख शेतकऱ्यांची दहा हजार एकर खरिपाची पिके तसेच अनेक लहान मोठी जनावरेही पुराच्या पाण्यात वाहून गेली असून पुराच्या तडाख्यात सापडून अनेक बांधवाने आपले जीव गमवावे लागले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने, यवतमाळ, विदर्भ व मराठवाड्यातील इतर जिल्हयातील नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी व पीक विम्याची रक्कम तातडीने अदा करावी तसेच मराठवाडा व इतर जिल्हयांसाठी विशेष पॅकेज लागू करावे यादृष्टीने शाासनाने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली आहे, वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१६-०३-२०२२) :** (१) खरे आहे.

(२) अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पायाभुत सुविधांच्या नुकसानीपोटी आवश्यक निधीचे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून सहाय्य मागणीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविता येईल. ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ च्या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीपोटी वाढीव दराने मदत देण्याकरीता शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक २६/१०/२०२१ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच, अतिवृष्टीमुळे मृत झालेल्या व्यक्तींना शासन निर्णय, दिनांक १३/०५/२०१५ मधील तरतूदीनुसार पात्र प्रकरणात मयत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत अनुज्ञेय असून त्याप्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मराठवाड्यामध्ये ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे सुमारे ३६५२८७२.९५ हेक्टर. आर क्षेत्र बाधित झाले आहे. तसेच अतिवृष्टीमुळे १५४ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. त्याचप्रमाणे छोटी व मोठी अशी एकूण २५९७ इतकी जनावरे मृत झाली आहेत.

(४) माहे जुलै, २०२१ तसेच ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्याकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ०६/१०/२०२१ अन्वये व शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २६ व २७/१०/२०२१ अन्वये निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागाच्या मागासवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या विविध योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व मुल्यमापन करण्याबाबत

**(१३) १०५८० (२०-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या विविध योजनांसाठी दरवर्षी प्राप्त होणाऱ्या हजारो कोटी रुपयांच्या निधीचा विनियोग नियोजनबध्दरित्या करून प्रत्येक गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळून प्रत्येक योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व मूल्यमापन करता यावे यासाठी दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा.सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली संविधान फाऊंडेशन यासह अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संघटनाच्या पदाधिकारी यांचे समवेत मंत्रालयात (मुंबई) येथे बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेलंगणा राज्याच्या धर्तीवर बजेट अंमलबजावणीचा कायदा करण्यात येणार असल्याचे मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्रसार माध्यमासमोर जाहीर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, युपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे मार्गदर्शन मिळावे यासाठी पुणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (बार्टी) पंचतारांकित अभ्यास केंद्र उभारण्याचे देखील विचाराधीन असल्याचे मा.सामाजिक न्याय मंत्री महोदय यांनी दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत जाहीर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाच्या मागासवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व मुल्यमापन करता यावे याद्दष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली होती.
(२) आंध्रप्रदेश, कर्नाटक व ओरिसा या राज्याने सन २०१३ पासून अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा कायदा केलेला आहे. सदरहू कायद्यांच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजना कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) होय, हे खरे आहे. बार्टी संकुल, येरवडा येथे एकूण ७० उमेदवारांचे निवासी युपीएससी प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना टोमॅटोचे वाजवी दर मिळणेबाबत

**(१४) १०५८३ (१९-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना येणारा टोमॅटो उत्पादनाचा खर्च व मिळणारे दर यामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे शेतकऱ्यांना टोमॅटो रस्त्यावर फेकून दयावे लागल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करुन त्यांना एकरी ५० हजार रुपयांची मदत तसेच पणन मंडळाद्वारे प्रतिकिलो १० रुपये दर शासनाने निश्चित करुन मागणी असलेल्या राज्याबाहेरील बाजार समित्यांमध्ये टोमॅटो दरात सुधारणा होण्याचे दृष्टीने टोमॅटो निर्यातीची शासनाने व्यवस्था करावी अशी मागणी टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांनी तसेच काही स्थानिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टोमॅटोला मातीमोल भाव मिळाल्यामुळे औरंगाबाद जिल्हयातील मौ.परसोडा (ता.वैजापूर) येथील शेतकऱ्याने आत्महत्त्या केली असल्याची दुर्देवी घटना देखील घडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील टॉमेटो उत्पादक शेतकऱ्यांना टॉमेटोच्या झालेल्या नुकसानीची भरपाई तसेच पणन मंडळाद्वारे सुधारित टॉमेटोचे दर निश्चित करुन टॉमेटो निर्यातीची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२४-०३-२०२२) :** (१) माहे ऑगस्ट, २०२१ च्या शेवटच्या आटवड्यामध्ये औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समिती उपबाजार आवार करमाड येथे साधारण ५६० शेतकऱ्यांनी टोमॅटो विक्रीसाठी आणला होता, त्यांना प्रति कॅरेट कमीत कमी रुपये ८० व जास्तीत जास्त रुपये १०० याप्रमाणे दर प्राप्त झाला होता.मोठ्या प्रमाणात आवक झाल्यामुळे व कमी भाव असल्यामुळे साधारण दररोज ४ ते ५ शेतकरी त्या आठवड्यात असे एकंदरीत २७ शेतकऱ्यांनी खराब प्रतीचा टोमॅटो विक्री विना यार्डात सोडून गेले होते. दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ नंतर कुठल्याही शेतकऱ्यांने टोमॅटो विक्री विना यार्डात सोडून गेल्याचा प्रकार घडलेला नाही.

(२) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(३) मौजे परसोडा येथील शेतकरी कै.राजु बकंटसिंग महेर यांनी दिनांक ३०/०८/२०२१ रोजी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केलेली आहे. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडून सदरहु शेतकऱ्याचे वारसाला धनादेश क्र.०७६९४५ अन्वये शेतकरी आत्महत्या अनुदान रक्कम रुपये १,००,०००/- रकमेपैकी ७०,०००/- एका वर्षाकरीता फक्स डिपॉझीट केलेले असून रुपये ३०,०००/- रोख स्वरुपात मदत करण्यात आलेली आहे.

(४) मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना राज्यात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षाकरीता राबविण्यास दिनांक २०/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेत क्रेडीट लिक्ड बँक एन्डेड ३५ टक्के व कमाल रुपये ५० लाख अनुदानाची तरतुद आहे. या योजनेचा लाभ अन्न प्रक्रिया प्रकल्प चालविणारे शासकीय/ सार्वजनिक उद्योग, सक्षम एफपीओ/ गट, महिला स्वयंसहाय्यता गट, खाजगी उद्योग क्षेत्र सहकारी संस्था, ग्रामीण बेरोजगार युवक घेवु शकतात. तसेच प्रक्रिया उद्योगासाठी केंद्र शासनाची प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेत प्रक्रियेकरीता वैयक्तिक सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना भांडवलासाठी बँक कर्जाशी निगडीत पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के कमाल रुपये १० लाख अनुदानाची तरतुद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वाधार योजनेच्या आर्थिक लाभापासून विद्यार्थी वंचित असल्याबाबत

**(१५) १०५८७ (२०-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार ही शैक्षणिक योजना इयत्ता अकरावी, बारावी आणि त्यानंतरच्या व्यावसायिक, तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या, परंतु कोणत्याही शासकीय किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द मागासवर्ग घटकातील विद्यार्थ्यांना भाड्याने खोली घेता यावी या

हेतूने शासनाने सन २०१६-२०१७ रोजी वा त्यादरम्यान सुरु केलेली असून या योजनेंतर्गत भोजन, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी शासनाकडून थेट अनुदान उपलब्ध करून देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी गत पाच वर्षात शासनाने वर्षनिहाय एकूण रुपये ४२१.७७ कोटी रुपयांची विद्यार्थ्यांसाठी आर्थिक तरतूद करुन देखील गत २ वर्षापासून अनेक विद्यार्थी आर्थिक लाभापासून वंचित असल्याचे दिनांक १ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर योजना या पुढील काळात बंद करण्यात येईल की काय याबाबत विद्यार्थी व पालक वर्गात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनांतर्गत निधी उपलब्ध असताना विद्यार्थी आर्थिक लाभापासून वंचित राहू नये यासाठी शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०७-०३-२०२२) :** (१) होय.

(२) मागील पाच वर्षात शासनाने एकूण रुपये ४२१.७७ कोटी तरतुद केली असून, सन २०१९-२०२०,सन २०२०-२०२१ या वर्षात रुपये १३५ कोटी तरतूद उपलब्ध झाली आहे. त्यापैकी रुपये १३२.५१ कोटी म्हणजेच ९८.१५% रक्कम खर्च झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी लाभापासून वंचित आहेत हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहराचा आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने दळणवळणाच्या मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) १०६२४ (१५-११-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातून डीएमआयसी, ड्रायपोर्ट, ऑरिफ,शेंद्रा चितेगांव,आणि वाळुज येथील ४०० हून अधिक कंपन्या ऑटोमोबाईल फार्मा, कृषी अणि पॉलिस्टर फिल्म ही उत्पादने ८० पेक्षा अधिक देशात निर्यात करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरातून मोठ्या प्रमाणात निर्यात होत असतानाही या शहरात रेल्वे,विमान आणि रस्ते या दळणवळणाच्या मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने शहराच्या औद्योगिक विकास घडण्यास समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने औरंगाबाद शहराचा आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने तात्काळ दळणवळणाच्या मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२१-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

सिमा शुल्क विभागाकडून प्राप्त माहितीनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील विविध उद्योगामधून सन २०२०-२१ मध्ये एकूण रुपये ३१,१३३.७७ लक्ष इतक्या किंमतीची निर्यात झालेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

औरंगाबाद शहरात रेल्वे, विमान आणि रस्ते या दळणवळणाच्या मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत. म.औ.वि. महामंडळाने औरंगाबाद येथील चिकलठाणा व औरंगाबाद ही औद्योगिक क्षेत्रे विकसित केली असून, सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

सदर औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा सन १९८७ मध्ये पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्या आहेत. तसेच वाळूज व शेंद्रा येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये म.औ.वि. महामंडळाकडून मुलभूत सोयी-सुविधा पुरविलेल्या असून, सदर सुविधांची देखभाल / दुरुस्ती नियमितपणे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतील गैरव्यवहाराबाबत

**(१७) १०६८८ (१९-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत शेतकऱ्यांची अडवणुक, निकृष्ट दर्जाचे सौरपंप तसेच सबसिडीसाठी राबविण्यात येणारी योजना व इतर सर्व बाबींची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधी यांनी माहे, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने जिल्ह्यात बसविण्यात आलेले कृषी सौरपंप, बंद पडलेले सौरपंप, कागदोपत्रीच दाखविण्यात आलेले सौरपंप व अर्ज निकाली काढण्यातील दिरंगाई यासंदर्भात शासन स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी कंत्राटदार, अधिकारी व यंत्रणा यांच्या विरूध्द कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१६-०३-२०२२) :** (१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधान परिषद सदस्य यांनी मा.मंत्री (ऊर्जा) महोदयांना लिहिलेले दिनांक २०/१०/२०२१ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) परभणी जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ३१५ तक्रार अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी २९१ म्हणजेच ९२% तक्रार अर्जातील तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

मुख्य अभियंता (नांदेड) व अधीक्षक अभियंता (परभणी) यांच्याद्वारे कंत्राटदारासोबत आढावा बैठक घेऊन पुरवठा करण्यात आलेल्या सौर कृषी पंपात बिघाड झाल्यास तो ताबडतोब दुरुस्त करण्याबाबत महावितरणकडून

सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सौर कृषी पंप आस्थापित करण्यास विलंब होत असल्यास शेतकऱ्यांना निवड केलेल्या पुरवठादाराऐवजी दुसरा पुरवठादार निवड करण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांनी तक्रारीचे निराकरण प्राप्त दिनांकापासून विहित कालावधीत (७ दिवसांत) केले नाही तर संबंधितांस तक्रार प्रलंबित राहिल्यापोटी पुढील ३ दिवसांकरीता प्रतिदिन रुपये १००/- व त्यानंतर पुढील प्रतिदिनास रुपये ५००/- याप्रमाणे तक्रारीचे निराकरण होईपर्यंत दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड व पोलादपूर तसेच परिसरातील भागात (ता.महाड, जि.रायगड) आलेल्या महापुरामुळे झालेल्या नुकसानाची शासनाकडून भरपाई मिळणेबाबत

**(१८) १०७१५ (१९-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड परीसरात (ता.महाड, जि.रायगड) दिनांक २१ व २२ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास आलेल्या महापुरामुळे अनेक कुटुंबे, दुकाने उद्ध्वस्त झाली असून अनेकांची घरे संपूर्णत: जमिनदोस्त झाल्यामुळे बहुसंख्य घरांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झालेले असून, अद्यापही पुरामुळे बाधित झालेल्या कोणालाही आर्थिक मदत प्राप्त झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड व तालुक्यात (ता.महाड, जि.रायगड) सदरहू पुरामुळे संपूर्णत: जमिनदोस्त झालेल्या घरांच्या झालेल्या नुकसानीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, दिनांक २१ व २२ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास आलेल्या महापूरात महाड शहरासह लगतच्या सुमारे ९० गावांमध्ये मोठा फटका बसला होता यादरम्यान शासकीय पातळीवरून करण्यात आलेल्या पंचनाम्यानंतर १० हजार ३५७ कौटुंबिक स्वरूपात तातडीची मदत प्रत्येकी १० हजार रूपये देण्याची तसेच सुमारे ४ हजार व्यापारी बांधवासाठी रूपये ५० हजार व दीड लाख रूपयांची मदत घोषित केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाड परिसरात (ता.महाड, जि.रायगड) पुरामुळे बाधित झालेल्यांना शासनाकडून विनाविलंब आर्थिक मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे, कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१६-०३-२०२२) :** (१) खरे नाही.

(२) महाड व पोलादपूर तालुक्यामध्ये पुरामुळे संपूर्ण: जमिनदोस्त झालेल्या घरांची संख्या ७५ असून शासन निर्णय, दिनांक १६/०९/२०२१ अन्वये रुपये ८५,१३,०५१/- एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) होय खरे आहे.

(४) दिनांक २१ व २२ जुलै,२०२१ रोजीच्या सुमारास अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या पुरपरिस्थितीमध्ये शेतीपिकांच्या नुकसानीकरिता व मालमत्तेच्या नुकसानीकरिता अनुक्रमे शासन निर्णय, दिनांक १६/०९/२०२१ अन्वये रुपये ६०४१.३६ लक्ष व शासन निर्णय, दिनांक ०६/१०/२०२१ अन्वये रुपये २८७.०० लक्ष असे एकूण रुपये ६३२८.३६ लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, रायगड यांना वितरित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोनामुळे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(१९) १०७४३ (१९-११-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच अकोला जिल्ह्यात कोरोनामुळे मृत्यूमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तींच्या कुटुंबियांना राज्य शासनाकडून ५० हजारांची मदत देण्यात येईल

अशी माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिली असून सदर मदत राज्य सरकारच्या आपत्ती निवारण निधीतून दिली जाणार असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात अथवा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्थसहाय्य देण्याबाबत अद्याप कोणतीही मार्गदर्शक सूचना किंवा शासन निर्णय निर्गमित झाला नसल्याने कोणत्याही प्रकारचे निदेश राज्य शासनाकडून जिल्हा प्रशासनाला अद्याप प्राप्त झालेले नसून मदत कधी मिळणार हे अनिश्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यात आतापर्यंत ११३७ कोरोना बळी गेले असून राज्यातही अनेकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला असून शासनाने केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने कोरोनामुळे मृत पावलेल्यांच्या वारसदारांना आर्थिक मदतीकरीता कोवीडचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारने मे महिन्यातच एसडीआरफ साठी सुमारे ८ हजार कोटींचा निधी विविध राज्यांसाठी आगाऊ वितरित केला असतानाही राज्ये सरकारकडून कोणतेच पुढील निर्देश झाले नसल्यामुळे सदर योजना कार्यान्वित होण्यास विलंब होत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(४) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरोना काळात मृत्यू पावलेल्या कोरोनाबळींच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत करण्यासाठी सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०७-०३-२०२२) :** (१) खरे आहे.

(२) खरे नाही.

कोव्हीड-१९ च्या आजारामुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या निकटच्या नातेवाईकास रुपये ५०,०००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्याबाबत दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) खरे नाही.

(४) कोरोनामुळे बळी पडलेल्या व्यक्तींच्या निकट नातेवाईकांस शासनाने विकसित केलेल्या वेबपोर्टलवर अर्ज करणे आवश्यक राहील व यासाठी अर्जदार स्वत: किंवा सेतू केंद्रातून किंवा ग्रामपंचायत सेवाकेंद्र-आपले सरकारमधून अर्ज करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय आश्रमशाळेत विविध कारणास्तव मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आधार अनुदान मिळणेबाबत

**(२०) १०७६० (१९-११-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत तीन वर्षात शासकीय आश्रम शाळेतील ३५३ विद्यार्थ्यांचा विविध कारणास्तव मृत्यू झाला असून आदिवासी विद्यार्थ्यांच्या झालेल्या मृत्यूची कारणे काय आहेत तसेच विद्यार्थ्यांच्या मृत्यूबाबत दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, मृत्यू पावलेल्या अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई मिळालेली नसून अनेक विद्यार्थी आधार अनुदानापासून वंचित आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आश्रम शाळेमध्ये अधीक्षक, गृहपाल हे आश्रम शाळेत अनुपस्थित असल्यामुळे विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होत असून विद्यार्थ्यांची काळजी घेतली जात नाही यास्तव गत तीन वर्षात अनेक विद्यार्थ्यांना आपले जीवन गमवावे लागले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूबाबत दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान मिळावे तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आधार अनुदानही तातडीने मिळावे याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-०३-२०२२) :** (१) आदिवासी विकास विभागातंर्गत राज्यात एकूण ४९७ शासकीय आश्रमशाळा असून गत तीन वर्षात शासकीय आश्रमशाळेतील ३५३ विद्यार्थ्यांचा अपघाती, आजारपण, सर्पदंश अशा विविध कारणाने मृत्यू झालेला आहे. मृत्यू प्रकरणात जबाबदार असलेल्या दोषींवर कार्यवाही केलेली आहे.

(२) मृत्यू पावलेल्या ३५३ विद्यार्थ्यांपैकी ३३१ विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे. उर्वरित १९ विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे व ३ विद्यार्थी बिगर आदिवासी असल्याने या ३ विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदान अदा केले नाही.

(३) हे खरे नाही.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शाळेच्या आवारामध्ये (मुख्यालयी) राहण्याबाबत दिनांक २४/८/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्युंचा आढावा घेणे, सामाजिक वैद्यकीय विष्लेषण व जबाबदारीने प्रत्यक्ष कार्यवाही त्वरित होणेसाठी दिनांक २८/१२/२०१६ शासन निर्णयान्वये विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत विद्यार्थी मृत्यूची चौकशी करण्यात येऊन दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. तसेच मृत्यू विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान करण्यात येते.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डीबीटीद्वारे लाभ देण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.